# चित्रा नाईक : एक शिक्षण तपस्वी

डॉ. प्रकाश कांबळे.
सहयोगी प्राध्यापक
श्रीमती सुशिलादेवी साळुंखे कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबाद.

परिचय :

*मुंबईतल्या एका सुख संपन्न कुटुंबामध्ये डॉ.चित्रा नाईक यांचा जन्म झाला. तो दिवस होता १५ जुलै १९१८. कुटुंबातली ही दुसरी मुलगी. पहिली मुलगी सुमती ही चित्राच्या जन्मावेळी आठ वर्षाची होती. वडील डॉ.हरिश्चंद्र बाळकृष्ण नाईक व आई गोदावरी. आईचे शिक्षण हे नववी पर्यंत झालेले होते. घरामध्ये या दोघी बहिणी, यांना भाऊ नव्हता. चित्राच्या आईने चित्राचे शिक्षण घरीच सुरू केले. वयाच्या चौथ्या वर्षी चित्रा वाचायला शिकल्या. मुळात त्यांना वाचनाची आवड होतीच. आई स्वत:साठी वाचनालयातून पुस्तके आणत असत, तेच साहित्य चित्राला वाचावयास मिळत असे. आईचा सहवास चित्राला जास्त काळ लाभला नाही. चित्राचे वय साडेसहा वर्षाचे होते त्यावेळी त्यांच्या आईचे निधन झाले. आईच्या निधनानंतर वडील मात्र कामात कायम व्यस्त असत. वडिलांचे आणि त्यांच्या धाकटया भावाचे कोर्टामध्ये खटले सुरू होते. मोठी बहीण सुमती ही माध्यमिक शाळेत जात होती. तिच्या वयाच्या मैत्रिणीमध्ये ती रमत असे. चित्राची आजी मुंबईच्या घरीच राहत होती. आजीला पुष्कळ संस्कृत श्लोक येत होते, तिने ते चित्राला शिकविले. मुंबईतील प्रार्थना समाजाच्या मागच्या बाजूला असलेल्या सर नारायण चंदावरकर या प्राथमिक शाळेमध्ये आजीने चित्राचे नाव दाखल केले. मुख्याध्यापकांनी चाचणी घेतली व चित्राला एकदम चौथीमध्ये प्रवेश दिला. नंतर चित्रा राममोहन इंग्लिश स्कूलमध्ये गेली. मोठी बहीण सुमती त्याच शाळेमध्ये शिकत असल्याने त्या दोघींना ते सोईचे झाले.*

खडतर परिस्थिती :

सुमती मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर एल्फिस्टन कॉलेजमध्ये गेली. तिथे हरिशंकर पायगावकर या युवकाशी तिची मैत्री जमली. त्या दोघांना लग्न करायचे होते पण घरच्या मंडळीचा विरोध होता. त्यावेळी चित्रा नववीमध्ये शिकत होती. चित्राच्या वडिलांनाही हा विवाह मान्य नव्हता. मात्र चित्रा ही जातिभेदाच्या विरोधात होती. आपल्या बहिणीच्या या लग्नाला तिचा पूर्णत: पाठिंबा होता. यावेळी चित्रा स्वत:चे घर सोडून आपल्या बहिणीकडे निघून गेली. त्यामुळे चित्राचे वडील फार संतापले. आपल्या लक्षावधीच्या इस्टेटीवर चित्राचा हक्क त्यांनी रद्द केला. चित्राची व तिच्या बहिणीची परिस्थिती मात्र कठीण होती. अशावेळी चित्राच्या शाळेतून तिला फी माफी मिळाली. तिच्या वहया पुस्तकांची सोय झाली. पुढे मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर चित्रा एल्फिस्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी गेली. त्यावेळी तिच्याकडे फी भरायला पैसे नव्हते. बहीण व तिचे मिस्टर खाजगी शाळेत नोकरी करत होते. त्यांनाही मिळणारी रक्कम अगदी तुटपुंजी होती. कॉलेजच्या प्राचार्यांनी चित्राच्या अभ्यासाची तयारी पाहून तिला फी माफी दिली शिवाय तिला स्वत:ची मदतनीस म्हणून नेमले. त्यावेळी तिला महिन्याचे पंचवीस रूपये मिळायचे. तिचे प्राचार्य आयरिश होते व त्यावेळी ते इंग्रजी व्याकरणावरती ते पुस्तक लिहित होते. चित्रा इंग्रजी आणि दोन एक्स्ट्रा ऑनर्स विषयांची परीक्षा देऊन बी.ए. उत्तीर्ण झाली. त्यावेळी तिला नोकरीची अत्यंत आवश्यकता होती.

महाविद्यालयीन शिक्षण :

चित्राच्या कॉलेजमध्ये स्वातंत्र्यप्रेमी विद्यार्थ्यांचा व गांधीजींची तत्त्वे मानणारा एक गट होता. अर्थातच त्या गटामध्ये चित्रादेखील होती. सरकारी नोकरी मात्र तिला नको होती. पण बहिणीच्या आग्रहाखातर नाशिक येथील मुलींच्या सरकारी शाळेतील नोकरी तिने स्वीकारली. लवकरच शाळेतील वातावरणात चित्रा रमून गेली पण ९ ऑगस्ट १९४२ रोजी भारत छोडोचा ठराव झाला. चित्रा मुंबईला परत आली, तिने शिकवण्या सुरू केल्या. शिकवण्यातून पैसे जमवून तिने मुंबईच्या सेकंडरी टिचर्स कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. दिवाळीच्या सुट्टीत तिने ऑल इंडिया रेडिओमध्ये काम केले. बी.टी.

च्या परीक्षेमध्ये ती पहिली आली. तिला कॉलेजची फेलोशिप मिळाली. तिने एम.एड.साठी प्रवेश घेतला. काही काळ चित्राने पत्रकारिता केली पण घरच्या कटकटीमुळे तिने ती सोडून दिली. मुंबई म्युनिसिपल कॉर्पोरेशनमध्ये मुलींच्या प्राथमिक शाळांच्या इन्स्पेक्टरची जागा रिक्त होती ती चित्राला मिळाली. त्यानंतर सेकंडरी टीचर्स कॉलेजमध्ये असिस्टंट लेक्चररची नोकरी चित्राला मिळाली. काही काळाने मुंबई राज्याचे शिक्षण सल्लागार डॉ.के.जी.सय्यिदेन यांच्या कार्यालयामध्ये राजपत्रित शिक्षणाधिकारी पदावर चित्राची नियुक्ती झाली. चित्राचे एम.एड.चे काम चालू असताना तिने सरळ पीएच.डी. करण्याचे ठरविले. तिचे मार्गदर्शक रा.वि.परूळेकर हे संचालक होते. पीएच.डी.चा प्रबंध पूर्ण झाला आणि १९४९ मध्ये चित्राला पीएच.डी.पदवी मिळाली. इंडियन इन्स्टिटयूटचे संस्थापक श्री जे.पी.नाईक यांच्याशी तिथे चित्राचा परिचय झाला.

सामाजिक कार्य :

चित्रा नाईकांनी पत्रकार असताना मुंबईच्या झोपडपट्टयातील आणि सुधारगृहातील मुलांच्या जीवनाचा आणि समस्यांचा अभ्यास केलेला होता. शारीरिक दुर्बलता आणि असाधारण मानसिकता असलेली, मोठया प्रमाणात पालकांनी सोडलेली मुले हा त्यांच्या अभ्यासाचा केंद्रबिंदू होता. प्रसिध्द मानसोपचार तज्ज्ञांचा संबंध आल्यामुळे चित्राच्या ज्ञानात वाढ झाली. पुढील अभ्यासाला इंग्लंडला जाण्यासाठी १९५० मध्ये युनेस्कोची पाठयवृत्ती चित्राला मिळाली. परत आल्यानंतर चित्राला मुंबईमध्ये सहाय्यक शिक्षण निरीक्षक या पदावर मुंबई सरकारमध्ये प्रथमवर्गीय अधिकारी म्हणून नियुक्ती मिळाली. १९५३ मध्ये अमेरिकेतील कोलंबिओ विदयापीठात शैक्षणिक अर्थशास्त्र आणि ग्रामीण शिक्षणाचे व्यवस्थापन अभ्यासण्यासाठी फेलोशिप मिळाली. अमेरिकेहून परत येताच डॉ.चित्रा नाईक यांची नियुक्ती सातारा जिल्हाच्या शिक्षणाधिकारी पदावर झाली. जे.पी.नाईकांनी १९५२—५३ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील गारगोटी येथे मौनी विदयापीठाची स्थापना केली. या संस्थेला भेट देण्याचे निमंत्रण डॉ.चित्रा नाईक यांना मिळाले. तेथील काम पाहून चित्रा खूप प्रभावित झाल्या. आचार्य भागवत व इतर स्नेह्यांच्या आग्रहाखातर १९५५ साली डॉ.चित्रा नाईक या जे.पी.नाईक यांच्याशी विवाहबध्द झाल्या. हा आंतरजातीय विवाह होता. डॉ. चित्रा नाईक यांची नेमणूक कोल्हापूरच्या शिक्षण महाविदयालयाच्या प्राचार्यपदी झाली. श्री जे.पी.नाईक हे भारत सरकारच्या अनेक कमिटयांवर होते. मौनी विदयापीठाकडे लक्ष देणे त्यांना अवघड जाऊ लागले. डॉ.चित्रा नाईक १९६३ मध्ये पुण्याला राज्य शिक्षणशास्त्र संस्थेच्या संचालकपदी दाखल झाल्या. त्यानंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या अध्यक्षा आणि महाराष्ट्र राज्याच्या शिक्षण संचालक पदापर्यंत त्या पोहोचल्या.

संचालक व संपादक :

जे.पी.नाईकांनी सुरू केलेल्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनचे स्थलांतर जेव्हा १९७६ मध्ये पुण्याला झाले तेव्हा त्या संस्थेच्या मानद संचालक म्हणून डॉ. चित्रा नाईक यांनी जबाबदारी स्वीकारली. त्यांनी नवसाक्षर प्रौढांसाठी व लहान मुलांसाठी ८२ पुस्तके लिहिली त्यापैकी काही पुस्तकांचे सर्व भारतीय भाषांमध्ये प्रकाशन झाले. शिक्षण आणि समाज या त्रैमासिकाच्या डॉ.चित्रा नाईक या शेवटपर्यंत संपादिका होत्या. त्यांनी घडविलेल्या अंशवेळ प्राथमिक शिक्षण या प्रकल्पाची प्रशंसा युनेस्कोने केली. त्यासाठी युनेस्कोने त्यांना जॅनअेमॉस कोमेनिअस मेडल हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार दिला. डॉ.चित्रा नाईक यांच्या ग्रामीण कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना १९८६ मध्ये पद्मश्री पुरस्कार दिला. विदयापीठ अनुदान मंडळाने डॉ.चित्रा नाईक यांना शैक्षणिक कृतिसंशोधनासाठी प्रणवानंद पुरस्कार दिला. त्यांना रामशास्त्री प्रभुणे पुरस्कार, साक्षरता कार्यासाठी टागोर पुरस्कार असे अनेक पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. डॉ.चित्रा नाईक १९८८ ते १९९१ या काळात महाराष्ट्राच्या नियोजन मंडळाच्या सदस्या आणि १९९१ ते १९९८ पर्यंत भारत सरकारच्या योजना आयोगाच्या त्या सदस्या होत्या. त्यांना मिळालेल्या पुरस्काराच्या सुमारे आठ लाखाच्या रकमा त्यांनी ग्रामीण शिक्षणाच्या विकासासाठी संशोधनासाठी इंडियन इन्स्टिटयूटला देऊन टाकल्या. याखेरीज स्वत:च्या निवृत्ती वेतनातून बारा लाख रूपये संस्थेसाठी देणगी म्हणून दिले. डॉ.चित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन ही संस्था कार्य करत आली आहे. या संस्थेतर्फे ग्रामीण भागातील महिला, बालके, शेतकरी, कामगार, छोटे उदयोग अशांच्या विकासाकरिता संशोधन व प्रशिक्षण कार्यक्रम

राबविले जातात.त्याकरिता पुणे विदयापीठाशी पदव्युत्तर संशोधनाकरिता संलग्न असलेले शिक्षण अभ्यासकेंद्र, पाबळ येथील विज्ञान आश्रम, ग्रामीण विज्ञान विनिमय केंद्र, श्रमिक विदयापीठ, अनौपचारिक व प्रौढ शिक्षण साधन केंद्र, नव्याने स्थापन झालेले जे.पी.नाईक शिक्षण व विकास केंद्र, मुंबईचे जी.डी. पारीख पदव्युत्तर शिक्षण केंद्र या सर्व संस्थांच्या एकत्रित कार्याचा रोख ग्रामीण भागातील महिला विकासावर आहे.

ग्रामीण भागातील कार्य :

डॉ.चित्रा नाईक यांच्या कार्याचे वैशिष्टय म्हणजे ग्रामीण भागातील भात शेतीच्या नवीन प्रयोगाची बाब असो, स्वावलंबनाने प्रगती यावर त्यांच्या संस्थेच्या मार्गदर्शनाचा भर आहे.त्यांच्या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील विविध शास्त्रज्ञ, शेतीतज्ज्ञ,वैदयक व्यावसायिक, सामाजिक कार्यकर्ते यांना एकत्र करून विविध स्वयंसेवी, स्वावलंबी योजना ग्रामीण विकासाकरिता राबविल्या जात आहेत.डॉ.चित्रा नाईक या महाराष्ट्राच्या माजी संचालिका. त्यांनी सहज सुंदर शैलीमध्ये मुलांचे गांधीजी हे पुस्तक लिहिले. ते हाती घेतल्यावर पूर्ण वाचूनच खाली ठेवता येते. महात्माजींची खरी ओळख मुलांना कथांमधून करून घेण्याचा हा त्यांचा लेखन आविष्कार कोणाही व्यक्तीला भारावून टाकील. हे काही केवळ मुलांना उपयुक्त ठरणारे पुस्तक नव्हे. ते खरे तर सर्वांना उद्बोधक ठरणारे म्हणता येईल.श्रमाची प्रतिष्ठा, इतरांना मदत करण्याची वृत्ती, सामान्यांबूलची तळमळ, श्रमातून समानता कितीतरी विषयांवर यात गोष्टी आहेत. डॉ. चित्रा नाईक खऱ्याखुऱ्या शिक्षिका, त्यामुळे कथा तर दिल्याच आहेत, पण त्यांच्यानंतर प्रत्येक प्रसंगावर मुलांच्या शब्दांत चर्चा पण आहे.त्यामुळे प्रत्येक शाळेत हे पुस्तक पोहोचायला हवे. प्रत्येक संस्कारक्षम मुलाला माता–पित्यांनी वाचून दाखवायला हवे. या पुस्तकाबूल चित्राताईचं ऋण व्यक्त करावे तेवढे थोडे आहे.डॉ.चित्रा नाईक यांनी निवृत्तीनंतर पुण्यात कोथरूडला राहायला बंगला घेतला व तेथे इन्स्टिटयूटचे काम सुरू केले.

समारोप –

जे.पी.नाईकांची दूरदृष्टी व चित्राताईंची कार्यकुशलता यामुळे अल्पावधीतच इन्स्टिटयूटमध्ये नवे चैतन्य निर्माण झाले व वसतिगृह आणि मुख्य इमारती यांचे बांधकाम १८९० मध्ये पूर्ण झाले. या काळात जे. पी.नाईक व चित्राताई पुण्यापेक्षा दिल्लीला आणि दिल्लीपेक्षा परदेशात जास्त दिवस असत. असेच डिसेंबर १८९० मध्ये ते दोघे बॅंकॉककडून परत आल्यावर जे.पी. नाईकांची प्रकृती बिघडली. हर्नियाचा त्रास म्हणून शस्त्रक्रिया झाली. त्यावेळी अन्ननलिकेचा कॅन्सर झाल्याचे उघडकीस आले. त्याला दोघांनीही धीराने तोंड दिले. इन्स्टिटयूटच्या नव्या इमारतीचे उद्घाटन २२ फेब्रुवारी १९८१ रोजी पार पडले. पण जे.पी.नाईकांची तब्येत खालावतच गेली आणि ३० ऑगस्ट १९८१ रोजी पहाटे त्यांचे निधन झाले. डॉ.चित्रा नाईक यांनी अनेक महिला व बालकल्याण समित्यांवर काम केले. वंचितांचा विकास हेच ध्येय ठेवून शिक्षण संस्था चालविली. प्रत्येक पालकाने ग्रामीण भागातील एक विदयार्थी दत्तक घ्यावा अशी त्यांची योजना होती. डॉ.चित्रा नाईक यांना श्वसनाचा त्रास जाणवू लागल्याने २२ डिसेंबर २०१० रोजी खाजगी रूग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार चालू असतानाच २४ डिसेंबर २०१० रोजी त्यांची प्राणज्योत मालवली. एका थोर शिक्षणतज्ज्ञाला देश पोरका झाला.

संदर्भ :

1. थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ.चित्रा नाईक यांच्या आठवणी, पुणे, वैदय खडीवाले वैदयक संशोधन संस्था.
2. चौबे, सरयु प्रसाद, भारतीय और पाश्चात्य शिक्षाशास्त्री (१९६९), आगरा, रामप्रसाद और सन्स.
3. www.bookganga.com